**श्री. विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर**
**<u>संगणक प्रणाली पुरवठा कामाचे जाहीर दरपत्रक.</u>**

मंदिर समितीच्या आस्थापनेवरील कर्मचाऱ्यांचे मासिक पगारपत्रक तयार करण्यासाठी 'संगणक प्रणाली' खरेदीसाठी जाहिर दरपत्रके मागविण्यात येत आहे. या संबंधीची माहिती, अटी व शर्ती संत तुकाराम भवन, पंढरपूर व www.vitthalrukminimandir.org या वेबसाईटवर उपलब्ध आहे.
क्र.लेखा विभाग/कावि/३१४/२०१८ दि. २०/०४/२०१८

स्वा/—
कार्यकारी अधिकारी

# श्री. विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर, जि. सोलापूर.

## मंदिरे समितीच्या आस्थापनेवरील कर्मचाऱ्यांचे मासिक पगारपत्रक तयार करण्यासाठी 'संगणक प्रणाली' खरेदीसाठी जाहिर दरपत्रक.

**माहिती, अटी व शर्ती खालीलप्रमाणे.....**

१. सदर खरेदी कामाची माहिती, अटी व शर्ती कार्यालयीन वेळेत संत तुकाराम भवन व www.vitthalrukminimandir.org या वेबसाईटवर उपलब्ध होवून मिळतील. तसेच सदरचे पुरवठा कामाचे दरपत्रक, डेमो प्रणाली ऑपरेटरसह कार्यकारी अधिकारी, श्री. विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर यांचे कार्यालयात दि.०३/०५/२०१८ रोजी स.११.००वा. प्रेझेनटेंशनसाठी उपस्थित रहावे. यावेळी सदर प्रणालीचा डेमो दाखवणे आवश्यक राहील.
२. मंदिर समितीच्या आस्थापनेवर सद्यस्थितीत कायम, हंगामी व मानधन कर्मचारी कार्यरत आहेत.
३. कायम कर्मचाऱ्यांना पाचव्या वेतन आयोगानुसार वेतन देण्यात येते. हंगामी कर्मचाऱ्यांना रोजंदारी दर मंजुर असून, त्यानुसार त्यांची रोजंदारी अदा करण्यात येते. तसेच मानधन कर्मचाऱ्यांना ठराविक मानधन निश्चित केलेले असून, त्यानुसार मानधन अदा करण्यात येते.
४. आपणाकडून पुरवठा करण्यात येणाऱ्या संगणक प्रणालीमध्ये उपरोक्त तिन्ही प्रकारच्या कर्मचाऱ्यांचे वेतनपट (Salary chart) असणे आवश्यक आहे. सदर वेतनपटामध्ये कायम कर्मचाऱ्यांकरिता सदर संगणक प्रणालीमध्ये कामाचे उपस्थित दिवस, मुळ पगार, महागाई भत्ता, महागाई वेतन, धुलाई भत्ता, घरभाडे भत्ता, वाहन भत्ता व अन्य भत्ते इत्यादींचा समावेश असणे आवश्यक आहे. तसेच स्थूल वेतनामधून (Gross Salary) भविष्य निर्वाह निधी, सोसायटी फंड, व्यवसाय कर, अग्रीम रक्कमा, एल.आय.सी. इ. रक्कमा कपात होणे आवश्यक आहे.

५. हंगामी कर्मचाऱ्यांकरिता सदर संगणक प्रणालीमध्ये उपस्थित कामाचे दिवस, रोजंदारीचा प्रति दिवसाचा दर, स्थुल रक्कम, भविष्य निर्वाह निधीच्या रक्कमा, व्यवसाय कर व इतर वसुली यांचा समावेश असणे आवश्यक आहे.

६. मानधन कर्मचाऱ्यांकरिता सदर संगणक प्रणालीमध्ये उपस्थित कामाचे दिवस, मानधनाचा मासिक दर, स्थुल रक्कम, भविष्य निर्वाह निधीच्या रक्कमा, व्यवसाय कर व इतर वसुली यांचा समावेश असणे आवश्यक आहे.

७. सदर संगणक प्रणालीचे दरपत्रक सादर करण्यापूर्वी आवश्यकता वाटल्यास, आपल्याकडील सक्षम प्रतिनिधीने मंदिर समितीचे लेखा शाखेतील कर्मचाऱ्यांचे वेतनपट पाहून त्यानुसार सदर संगणक प्रणाली तयार करावी व त्यानुसार दरपत्रक सादर करावे.

८. सदर संगणक प्रणालीचा Interface हा user friendly असणे आवश्यक आहे. समितीच्या लेखा विभागातील कर्मचाऱ्यांना सदर Interface वापरताना कोणतीही अडचण येणार नाही. याची दक्षता घेण्यात यावी.

९. सदर संगणक प्रणालीमधून प्रत्येक महिन्याच्या वेतनपटाचा गोषवारा (Summary) हा स्थुल रकमा व वजातीच्या रक्कमासह येणे आवश्यक आहे. कर्मचाऱ्याचा भविष्य निर्वाह निधी, व्यवसाय कर, सोसायटी फंड, एलआयसी, अग्रीम वसुलीच्या रक्कमा इत्यादीचा गोषवारा येणे आवश्यक आहे.

१०. कंपनीने सदर संगणक प्रणालीची देखभाल दुरूस्ती किमान ३ वर्षासाठी करणे आवश्यक आहे. सदर संगणक प्रणालीमध्ये काही बिघाड झाल्यास अथवा अत्यावश्यक बदल करावयाचा झाल्यास, आपल्या स्तरावरून ताबडतोब दुरूस्ती / बदल करून देणे आवश्यक आहे.

११. दरपत्रकामध्ये सदर संगणक प्रणालीचा दर सर्व करासहीत, पोहोच खर्चासह, इन्स्टालेशन चार्जेससह व किमान ३ वर्षाच्या देखभाल दुरूस्तीसह नमुद करावा.

१२. सदरच्या संगणक प्रणालीमध्ये अत्याधुनिक सुविधा उपलब्ध असणे आवश्यक आहे. सदर प्रणालीची गुणवत्ता चांगली असणे आवश्यक आहे.

१३. सदर संगणक प्रणालीसाठी आपल्या कंपनीचे लायसन्स कॉपी आवश्यक असून, याचा दुरूपयोग अन्य कोणत्याही संस्थेने अथवा कार्यालयाने करता कामा नये.

१४. सदरचे दरपत्रक सादर करतेवेळी खालीलप्रमाणे कागदपत्रे जोडणे आवश्यक आहे.

(१) पूर्वी पुरवठा केलेल्या कामाची अनुभवाची प्रमाणपत्रे.

(२) कंपनीचे / फर्मचे पॅनकार्ड.

(३) जीएसटी नोंदणी प्रमाणपत्र.

(४) व्यवसाय परवाना.

(५) कंपनी नोंदणी प्रमाणपत्र.

१५. सदर संगणक प्रणालीचा पुरवठा मंदिर समितीचे मागणीनुसार मुदतीत करणेचा आहे. त्यास विलंब झालेस पुरवठाधारकास जबाबदार धरून सदर संगणक प्रणालीच्या किमतीच्या ५ टक्के पर्यंत दंड आकारण्यात येईल.

१६. सदर संगणक प्रणाली खरेदी करताना मंजुर दराव्यतिरिक्त कोणताही कर अदा केला जाणार नाही. तसेच सदर पुरवठा कामाचे बिल अदा करताना नियमानुसार २% आयकर कपात केली जाईल.

१७. सदर पुरवठा कामासाठी कोणतीही ॲडव्हान्स रक्कम अदा केली जाणार नाही.

**१८. <u>सदर संगणक प्रणाली लेखा विभाग, श्री. विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर येथे दोन संगणकावर इन्स्टॉलेशन करून देणे आवश्यक आहे.</u>**

१९. समिती वेळोवेळी जे निर्देश देईल अथवा अटीत जे बदल करेल ते पुरवठाधारकांस बंधनकारक राहील.

२०. दरपत्रक ज्यांचे नांवे मंजूर होईल, त्यांनी रक्कम रूपये १००/— चे स्टॅम्प पेपरवर सर्व अटी व शर्ती मान्य असलेबाबतचे (affidivit) प्रतिज्ञापत्र करून देणे आवश्यक आहे.

२१. प्रशासकीय व अन्य कारणास्तव दरपत्रक/पुरवठा प्रक्रिया कोणत्याही स्तरावर स्थगीत अथवा रद्द करण्याचा अधिकार मंदिर समितीने राखुन ठेवलेला आहे.

२२. सदर कामासंबंधी काही वाद उद्‌भल्यास त्यासाठी न्यायालयीन कार्यक्षेत्र पंढरपूर हे राहील.

२३. वरील कोणत्याही एका अटी व शर्तीचा भंग झालेस पुरवठादारास जबाबदार धरणेत येईल व मंजूर दरपत्रक कोणत्याही क्षणी रद्द केले जाईल.

———//———